।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना ६ नोव्हेंबर १९८३

RNI NO. MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.९ मार्च २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ११ वा


## अर्थसंकल्पीय अधिवेशनात सांगोला तालुक्यातील प्रलंबीत प्रश्नावर आ.बाबासाहेब देशमुख आक्रमक



सांगोला : ठिबक अनुदान, छावणी चालकांची प्रलंबित बिले, सांगोला तालुक्यातील माण, कोरडा नद्यांना कालव्याचा दर्जा देऊन कायमस्वरूपी पाणी सोडावे. प्रत्येक तालुक्यात पत्रकार भवन उभारावे, शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात यावे, दूध उत्पादकांना तिसऱ्या टप्प्यातील अनुदान द्यावे. कर्नाटकाच्या धर्तीवर दुधाला कायमस्वरूपी तीन रुपये अनुदान द्यावे, सांगोल्याला नवीन २५ एसटी बस मिळाव्यात, जिल्हा परिषदेच्या शळांची दुरुस्ती करावी, अशा अनेक मागण्या सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मुंबईत अर्थसंकल्पीय अधिवेशनात केल्या.

मुंबईत सध्या अर्थसंकल्पीय अधिवशेन सुरू आहे. त्या अधिवेशनात सांगोला विधानसभा मतदारसंघातील कामाबाबत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विविध प्रश्न उपस्थित करत ते लवकरात लवकर सोडविण्याची मागणी राज्य सरकार कडे केली. छावणी चालकांची बिले व्याजासहित लवकरात लवकर द्यावीत अशीही मागणी आ.डॉ. बाबासाहेब देशमुख विधानसभेत लावून धरली.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील स्मारकाचा मुद्दा उपस्थित केला. या स्मारकाबाबत हालचाली होत नसल्याने मराठी माणूस दुखी होत आहे. हे स्मारक तातडीने उभारण्यात यावे. तसेच, मुंबईत विधीमंडळाच्या आवारात सांगोल्यातून अकरा वेळा निवडून आलेले स्व.गणपतराव देशमुख यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ते स्मारक लवकरात लवकर व्हावे, अशी मागणी केली होती.

विधीमंडळाच्या आवारात स्व.गणपतराव देशमुख यांचे स्मारक उभारण्याबाबत तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूतोवाच केले होते. त्याला दोनअडीच वर्षांचा काळ लोटला तरी अद्याप स्मारकाच्या कामाबाबत कोणतीही हालचाल होऊ शकलेली नाही, त्यामुळे गणपतराव देशमुखांचे स्मारक कधी होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला स्मारकाबाबतची आठवण करून दिली. तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूतोवाच केले होते. त्याला दोन-अडीच वर्षांचा काळ लोटला तरी अद्याप स्मारकाच्या कामाबाबत कोणतीही हालचाल होऊ शकलेली नाही, त्यामुळे स्व.गणपतराव देशमुख यांचे स्मारक कधी होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## सकल मराठा समाजाच्या वतीने आज सांगोला बंद व भव्य मुक मोर्चाचे आयोजन



सांगोला : बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच कै.संतोष देशमुख यांची व स्व. सोमनाथ सुर्यवंशी यांची हत्या करण्यात आली. तरी या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे या मागणीसाठी आज रविवार दिनांक ९ रोजी भव्य मुक मोर्चा व सांगोला बंद पाळण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सकल मराठा समाज सांगोला तालुका यांच्यावतीने देण्यात आली.

जनावरांची खरेदी विक्रि बंद राहणार आहे. भाजी मंडई आठवडा बाजार व व्यापार पेठ बंद ठेवण्यात येणार असून, व्यापारी, शेतकरी, बाजारकरू यांनी रविवारी खरेदी विक्रिसाठी येऊ नये, असे आवाहन सकल मराठा समाज सांगोला तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे. संतोष देशमुख हत्याकांडाचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालेत. त्यातून संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी बंदची हाक देण्यात येत आहे याच पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज सांगोला तालुका यांच्याकडून सांगोला बंदची हाक ही देण्यात आली आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये ही सदर बंद पाळण्यात येणार आहे. या निमित्ताने आज रविवारी सकाळी १० वाजता शहरातील महात्मा ज्योतिबा फुले येथून सांगोला तहसील कचेरीवर मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. याकरिता तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव तसेच इतर समाज बांधवांनी वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन ही सकल मराठा समाज सांगोला तालुका यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## ग्राहकांनी आपली थकबाकी व चालू विज बिल भरुन महावितरण कार्यालयास सहकार्य करावे

## थकबाकी न भरल्यास विद्युत पुरवठा खंडित करण्याची कारवाई होणार

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

सांगोला : वीज बिल थकबाकी वसुलीसाठी वसुली पथक यासह कार्यालयीन टीम कार्यान्वीत करण्यात आली आहे. घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक अशा एकूण १५ हजार ०४० वीज ग्राहकांकडे २ कोटी ६० लाख ६२ हजार रुपयांच्या थकबाकी वसुली करण्याची मोहीम हाती घेण्यात आली असून, थकबाकीदार वीज ग्राहकांनी थकबाकी न भरल्यास त्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याची कारवाई केली जाणार आहे, असा इशारा सांगोला महावितरणचे उपकार्यकारी अभियंता गणेश पोवार व हातिद महावितरणचे उपकार्यकारी अभियंता हनमंत बनसोडे यांनी दिला आहे.

सांगोला सबस्टेशन अंतर्गत २७ हजार तर हातीद सब स्टेशन अंतर्गत १८ हजार १४७ असे एकूण सांगोला तालुक्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगीक असे एकुण ४५ हजार १४७ वीज ग्राहक आहेत. पैकी घरगुती व्यवसायिक व औद्योगिक अशा १५ हजार ०४० वीज ग्राहकांकडे थकबाकी पोटी २ कोटी ६० लाख ६२ हजार रूपये थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी वरिष्टांच्या आदेशानुसार कार्यालयाकडून प्रयत्न केले जात आहे. थकबाकी मोहिमेतंर्गत सदरची वसुली करण्यासाठी ९ शाखा कार्यालय अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या माध्यमातून ही वसुली केली जात आहे. सध्या वसुली करण्यासठी गावपातळीवर कार्यालयीन टीम कार्यान्वीत करण्यात आली आहे. यासह वसुली पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

ज्या ग्राहकांकडे थकबाकी आहे, अशा ग्राहकांनी थकबाकी न भरल्यास त्या ग्राहकांचा जागेवर विद्युत पुरवठा खंडीत करण्याची कारवाई केली जात आहे. वरिष्ठांच्या आदेशानुसार सांगोला शहर आणि तालुक्यातील थकबाकीदार वीज ग्राहकांच्या थकबाकी वसुलीसाठी वसुली पथकाची निर्मिती करण्यात आली आहे.थकबाकी वसुली मोहिमेतंर्गत सांगोला व हातिद वीज वितरण कार्यालयाकडून वीज बिल वसुली मोहिमेला व विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या कारवाईला धुमधडाक्यात शुभारंभ केला आहे. ज्या वीज ग्राहकांकडे थकबाकी आहे अशा वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

विशेष टीमद्वारे विद्युत पुरवठा खंडीत करणे व वसुली करणे ही मोहिम राबविण्यात येत आहे. वीज ग्राहकांनी आपला थकीत व चालू वीज बिल भरावे आणि कारवाईपासून बचाव करावा, असे आवाहन उपकार्यकारी उपअभियंता गणेश पोवार व हनमंत बनसोडे यांनी केले आहे.

सांगोला महावितरण कार्यालया अंतर्गत एकूण २७ हजार वीज ग्राहक आहेत. पैकी ९१७ व्यावसायिक ग्राहकांकडे ५० लाख, ८२ औद्योगिक ग्राहकांकडे ५ लाख ९७ हजार, ७ हजार ९७६ घरगुती ग्राहकांकडे १ कोटी १६ लाख असे एकूण ८ हजार ९७५ थकबाकीदार वीज ग्राहकांकडे १ कोटी ७२ लाख ३९ हजार रुपयांची थकबाकी आहे. सदर वसुलीसाठी वसुली पथक व कर्मचारी कार्यान्वित करण्यात आले आहे. थकबाकीदार वीज ग्राहकांनी थकबाकी व चालू विज बिल देयक जमा करून महावितरण कार्यालयात सहकार्य करावे.

**– गणेश पोवार, उपकार्यकारी अभियंता, सांगोला**

महावितरण कार्यालय हतिद महावितरण कार्यालया अंतर्गत एकूण १८ हजार १४७ वीज ग्राहक आहेत. पैकी ३८२ व्यावसायिक ग्राहकांकडे १७ लाख २९ हजार, ५७ औद्योगिक वीज ग्राहकांकडे ६ लाख ६५ हजार, ५ हजार ६२६ घरगुती ग्राहकांकडे ६४ लाख ०७ हजार असे एकूण ६ हजार ०६५ थकबाकीदार वीज ग्राहकांकडे ८८ लाख २३ हजार रुपयांची थकबाकी आहे. सदर वसुलीसाठी वसुली पथक व कर्मचारी कार्यान्वित करण्यात आले आहे. थकबाकीदार वीज ग्राहकांनी थकबाकी व चालू विज बिल देयक जमा करून महावितरण कार्यालयात सहकार्य करावे.

**–हणमंत बनसोडे उपकार्यकारी अभियंता, हतिद महावितरण कार्यालय**

# संपादकीय......

जुने वर्ष–४२ वे
अंक–१५ वा

## आंतरराष्ट्रीय महिला दिन

गेल्या शतकभरापासून जगभरातील लोक ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करतात.गेल्या शतकभरापासून जगभरातील लोक ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करतात.जगभरातील लोक गेल्या शतकभरापासून ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करतात. लैंगिक विषमता आणि भेदभावाबद्दल जागरुकता वाढवताना महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठीचा आणि तो साजरा करण्यासाठीचा हा जागतिक दिवस आहे.पण हा दिवस इतका महत्त्वाचा का आहे? या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची सुरुवात नेमकी कशी झाली? हे जाणून घेऊयात.आंतरराष्ट्रीय महिला दिन (खथऊ) हा कामगार महिलांच्या हक्कांसाठी झालेल्या चळवळीतून निर्माण झाला.

१९०८ मध्ये १५,००० महिलांनी कामाचे तास कमी व्हावेत, चांगलं वेतन मिळावं आणि मतदानाचा हक्क मिळावा या मागण्यांसाठी न्यूयॉर्क शहरात एक मोर्चा काढला होता.आंतरराष्ट्रीय महिला दिन: भारतीय महिला खरंच समृद्ध होत आहेत का?महिला दिन का साजरा करतात, काय आहे या दिवसाचा इतिहास?

आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्चलाच का साजरा करतात?वर्षभरानंतर अमेरिकेच्या सोशलिस्ट पार्टीनं लगेचच पुढच्या वर्षी हा दिवस 'राष्ट्रीय महिला दिन' म्हणून घोषित केला.त्यानंतर क्लारा झेटकिन यांनी १९१० मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाची सुरुवात केली. क्लारा झेटकिन या जर्मन कम्युनिस्ट आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्या होत्या.या दिवसाला एक आंतरराष्ट्रीय सोहळा बनवण्याची कल्पना त्यांची होती.
१९१० मध्ये कोपेनहेगन येथे झालेल्या कामगार महिलांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत (इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ वर्किंग वुमेन) त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला.या परिषदेत उपस्थित असलेल्या १७ देशांतील १०० महिलांनी एकमतानं त्यांना जोरदार पाठिंबा दिला.ऑस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनी आणि स्वित्झर्लंड मध्ये १९११ मध्ये पहिला आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला.१९७७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघानं देखील त्याला अधिकृत मान्यता दिली. १९११ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघानं स्वीकारलेली पहिली थीम ही 'भूतकाळाचं सेलिब्रेशन,भविष्याचं नियोजन' अशी होती.

१९१७ मध्ये युद्धकालीन संपात रशियन स्त्रियांनी ब्रेड आणि शांती ची मागणी केल्यानंतर ८ मार्च या तारीखेची निवड करण्यात आली.संपाच्या चार दिवसांनंतर झारला सत्ता सोडावी लागली आणि तात्पुरत्या सरकारनं महिलांना मतदानाचा अधिकार दिला.त्यावेळी रशियात वापरात असलेल्या ज्युलियन कॅलेंडरनुसार २३ फेब्रुवारीपासून महिलांचा संप सुरू झाला. ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये ती तारीख ८ मार्च आहे.
आंतरराष्ट्रीय महिला दिन हा अनेक देशांमध्ये राष्ट्रीय सुटीचा दिवस असतो. चीनमध्ये स्टेट काऊन्सिलच्या सल्ल्यानुसार अनेक महिलांना अर्ध्या दिवसाची सुटी दिली जाते.जगभरात मोर्चे, चर्चा, मैफिली, प्रदर्शनं आणि वादविवाद असे हजारो कार्यक्रम होतात.२०२४ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या दिवशी फ्रान्सच्या राज्यघटनेत गर्भपाताचे अधिकार समाविष्ट करण्यात आले होते.इटलीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाला फेस्टा डेला डोना म्हणतात. तिथं या दिवशी मिमोसा ब्लॉसम ही लोकप्रिय फुलं भेट म्हणून दिली जातात.रशियात फुलांची विक्री साधारणपणे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या आसपास दुप्पट होते.

इटलीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाला फेस्टा डेला डोना म्हणतात. त्यांच्याकडं या दिवशी मिमोसा ब्लॉसम ही लोकप्रिय फुलं भेट म्हणून दिली जातात.१९८४ पासून आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करणाऱ्या युगांडामध्ये सरकार दरवर्षी एक वेगळी थीम निवडतं.सर्बिया, अल्बानिया, मॅसेडोनिया आणि उझबेकिस्तानसह काही देशांमध्ये मदर्स डे आणि आंतरराष्ट्रीय महिला दिन एकाच दिवशी येतात.अमेरिकेत मार्च हा महिलांच्या इतिहासाचा (वुमन्स हिस्ट्री)महिना म्हणून साजरा केला जातो. अमेरिकन महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी जारी करण्यात येणाऱ्या अध्यक्षीय घोषणेत महिलांचा गौरव करण्यात येतो.

मादागास्कर आणि नेपाळमध्येही या दिवशी महिलांसाठी अधिकृत सुट्टी असते. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या वेबसाइटनुसार जांभळा, हिरवा आणि पांढरा हे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे रंग आहेत.त्यात म्हटलं आहे की, जांभळा रंग न्याय आणि प्रतिष्ठेचं प्रतिक आहे, हिरवा रंग आशेचं प्रतीक आहे तर पांढरा रंग शुद्धतेचं प्रतिनिधित्व करतो.या रंगांचा वापर १९०३ मध्ये ब्रिटनमधील महिलांच्या मतांसाठी लढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वुमन्स सोशल अँड पॉलिटिकल युनियन (डब्ल्यूएसपीयू) या गटानं केला होता.

२०२३ मध्ये लैंगिक हिंसाचाराच्या ३,६८८ घटनांमध्ये वाढ झाल्याची पुष्टी संयुक्त राष्ट्रांनी केली आहे. ती २०२२ च्या तुलनेत ५०% नं वाढली आहे. यात ९५% टक्के पीडित महिला आणि मुलींचा समावेश आहे.युनिसेफच्या म्हणण्यानुसार, अंदाजे ११९ दशलक्ष मुली शाळेत जात नाहीत.

जागतिक बँक समूहाच्या २०२४ च्या अहवालानुसार पुरुषांना मिळणाऱ्या कायदेशीर अधिकारांपैकी केवळ दोन तृतियांश अधिकार महिलांना मिळतात.बीबीसी १०० वुमेननं नोंदवलं की, २०२४ मध्ये जगातील जवळजवळ अर्ध्या लोकसंख्येच्या (३.६ अब्ज लोकांच्या) मोठ्या निवडणुका होत्या. पण त्यात २० वर्षांपासून महिला प्रतिनिधित्वाच्या वाढीचा दर सर्वात कमी होता.युनिसेफच्या म्हणण्यानुसार, अंदाजे ११९ दशलक्ष शाळकरी मुली शाळेत जात नाहीत.

## धर्म वार्ता

### स्वामी विवेकानंदांची शिकवण



स्वामी विवेकानंदांशी संबंधित एक कथा आहे. स्वामी विवेकानंद त्यांच्या आश्रमात उपदेश करत होते. त्यांचे प्रवचन ऐकणाऱ्यांपैकी एक जण उभा राहिला आणि स्वामीजींना विचारू लागला की त्याला यश का मिळत नाही. तो सतत प्रश्न विचारत होता आणि वाद घालत होता. ती व्यक्ति म्हणत होती की मी दिवसभरात खूप काम करतो, खूप कष्ट करतो, पण माझे कोणतेही काम पूर्ण होत नाही. मी यशस्वी होऊ शकत नाही.

विवेकानंदजींनी त्या व्यक्तिला समजावून सांगण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. ते काही समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच, तो माणूस पुन्हा बोलू लागला, तो गप्प बसत नव्हता. स्वामीजी शांत झाले, त्यांना समजले की ही व्यक्ति जे म्हणत होती ते म्हणजे तो खूप कष्ट करतो पण यश मिळत नाही.जेव्हा तो बोलून बोलून थकला तेव्हा स्वामीजींनी त्या व्यक्तिला सांगितले की मी तुमच्या प्रश्नांची उत्तरे देईन, पण त्याआधी तुम्ही माझ्यासाठी एक काम करू शकाल का?तो माणूस म्हणाला, सांगा, काय काम आहे?
स्वामीजी म्हणाले की आमच्या आश्रमात एक कुत्रा आहे, तुम्ही त्याला थोडा वेळ फिरायला घेऊन जा. त्याला फिरायला घेऊन जाणारी व्यक्ति सध्या इथे नाहीये, तू आजच त्याला फिरायला घेऊन जा. हा कुत्रा खूप आज्ञाधारक आहे.स्वामीजींच्या सल्ल्यानुसार, तो माणूस कुत्र्याला फिरायला घेऊन गेला. तासाभरानंतर तो माणूस कुत्र्याला फिरवून परतला. ती व्यक्ति कमी थकली होती, पण कुत्रा खूप थकला होता, त्याला चालताही येत नव्हते.विवेकानंदजींनी त्या व्यक्तिला विचारले की तुम्ही दोघे एकत्र गेलात आणि एकत्र परतलात, पण हा कुत्रा खूप थकला आहे आणि तुम्ही कमी थकला आहात. हे का घडले?तो माणूस म्हणाला की जेव्हा जेव्हा त्याला रस्त्यावर इतर कुत्रे दिसले तेव्हा तो त्या रस्त्यावर धावत गेला, मग मी दोरी धरून त्याला परत आणले. मी थोडा पुढे गेलो तर तो धावायला लागत होता; तो संपूर्ण वेळ धावत राहिला, त्यामुळे ते थकणार हे निश्चित होते. त्या तुलनेत मी कमी काम केले, त्यामुळे मी थकलो नाही.

स्वामीजी म्हणाले की, मला वाटते की तुम्हाला तुमच्या प्रश्नांचे उत्तर सापडले आहे. जर तुम्ही दिवसभर एकाच वेळी अनेक कामे करण्यासाठी धावत राहिलात तर तुमची ऊर्जा वाया जाईल, तुम्ही थकून जाल, पण कोणतेही काम पूर्ण होणार नाही. प्रथम एक काम ठरवा, स्वतःवर लक्ष केंद्रित करा आणि नंतर तुमच्या ध्येयाकडे वाटचाल करा. जर तुम्ही एका वेळी एकाच कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल.
स्वामी विवेकानंदांची शिकवणः- अनेक ध्येयांमागे धावण्याऐवजी आपण एकच ध्येय ठेवले पाहिजे. तुमचे प्रयत्न अनेक दिशांना वाया घालवू नका. तुमची ऊर्जा एकाच ठिकाणी विचारपूर्वक केंद्रित करा.

## सुविचार

**अस्तित्व टिकवायच असेल तर स्वत:मध्ये हिम्मत पाहिजे, एकट असलं तरी सर्वांना पुरून उरायचं.**

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# चोपडी येथील श्री.सिद्धनाथ बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे कार्य आदर्शवत : पुनम सावंत



सांगोला : चोपडी येथील श्री सिद्धनाथ बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे विविध उपक्रम हे आदर्शवत व प्रेरणादायी आहेत. जागतिक महिला दिन म्हणजे स्त्रीयांच्या सन्मानाचा दिवस आहे. मुलींनी व स्त्रियांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा निर्माण करावा. जीवनात आई–वडील हेच आपले मित्र आहेत. समाजातील वाईट गोष्टीचा वेळीच प्रतिकार करण्यासाठी महिलांची एकजुट आवश्यक आहे. श्री सिद्धनाथ बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने या संस्थेचे अध्यक्ष पत्रकार दशरथ बाबर यांनी संस्थेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेला विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान सोहळा म्हणजे त्यांच्या जीवनातील आनंददायी क्षण व विकासाला प्रेरणा देणारा उपक्रम आहे, असे विचार कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या पुनम सावंत यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकास एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ आनंदराव गोपाळ बाबर हे होते. सांगोला तालुक्यातील श्री. सिद्धनाथ बहुउद्देशीय सामाजिक संस्था चोपडी या संस्थेच्या वतीने संस्थेचा ५ वा वर्धापन दिन, जागतिक महिला दिन, मान्यवरांचा सन्मान सोहळा, व वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ वाजता बाळासाहेब देसाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चोपडी येथे संपन्न झाला. बाळासाहेब देसाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य के.डी. बाबर यांनीही मनोगत व्यक्त केले . यावेळी जीवनाच्या विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा लौकिक मिळविलेल्या पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये विकास एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आनंदराव गोपाळ बाबर, आदर्श माता श्रीमती सिंधुताई कृष्णा बाबर, आदर्श डॉ. वामन गिरीधर चांडवले, यशस्वी उद्योजक शहाजी(आबा) नामदेव बाबर, संस्थेचे मार्गदर्शक प्राचार्य के.डी बाबर, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या पुनम सावंत ,पत्रकार क्षेत्रातील विविध पुरस्कार प्राप्त करणारे चांदभैय्या शेख , सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी एल. बी. केंगार, राज्य उपाध्यक्ष डिजिटल मीडिया संपादक– पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे सतीशभाऊ रावसाहेब सावंत, महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघटनेचे अध्यक्ष रविराज शेटे सर, पोलीस पाटील श्रीमती. सीतादेवी रामचंद्र पाटील, महाराष्ट्र पोलीस सुदर्शना राहुल बाबर,आदर्श शिक्षिका वंदना ज्ञानेश डोंगरे ,डॉ. प्रतिभा केशव बाबर, डॉ. सुवर्णा आनंदराव पाटील–बाबर, डॉ. क्षितिजा मकरंद डोंगरे, उपक्रमशील अंगणवाडी सेविका पूनम सुनील जवंजाळ,आदर्श महिला शेतकरी सुनिता नवनाथ बाबर, नूतन उद्योजक वनिता बाळासाहेब बाबर,स्वच्छतादूत आप्पासाहेब बाबा केंगार ,आपलं मेडिकल चोपडी व आपलं मेडिकल नाझरा या मेडिकलचे मालक रघुनाथ हरिबा बाबर, पत्रकार शशिकांत कोळी, पत्रकार सुनील पवार यांचा शाल श्रीफळ व झाड देऊन सन्मान करण्यात आला.

जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेते लहान गट– श्रावणी संभाजी पाटील इयत्ता सातवी– प्रथम क्रमांक, तेजस्विनी समाधान बाबर इयत्ता सहावी –द्वितीय क्रमांक, सृष्टी रामचंद्र वराडे इयत्ता सहावी–तृतीय क्रमांक, तेजस्विनी हणमंत बाबर इयत्ता पाचवी –तृतीय क्रमांक, मोठ्या गटात –अमृता विजय बाबर आठवी ब – प्रथम क्रमांक, तृप्ती दादासो खरात इयत्ता नववी ब– द्वितीय क्रमांक,सिद्धी विजय बाबर इयत्ता नववी ब –तृतीय क्रमांक या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आपलं मेडिकलचे मालक रघुनाथ बाबर यांच्या तर्फे स्कूल बॅग व शांभवी प्रशांत केंगार हिच्या वाढदिवसानिमित्त एल .बी. केंगार यांच्या तर्फे आंब्याची झाडे भेट देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी बाळासाहेब यादव, सेवानिवृत्त शिक्षक रामचंद्र केंगार, डॉ. नवनाथ बाबर ,अजिततात्या बाबर, बलभीम बाबर , बजरंग बाबर,युवानेते अनिल चौगुले, लक्ष्मण चौगुले, सिद्धनाथ गुरव, अजित बाबर, राजश्री चांडवले स्वाती बाबर, पार्वती केंगार, तसेच बाळासाहेब देसाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका कर्मचारी ,अंगणवाडी सेविका–अलका सूर्यवंशी, सविता चौगुले, मनीषा खळगे, सविता बाबर, ताई जावीर , विजया मेखले, पार्वती केंगार ,उषाताई बंडगर , आरोग्य सेविका–लक्ष्मी माळी, आशा वर्कर – अर्चना दीक्षित, शोभा बाबर ,सुवर्णा पवार ,सुमन तोरणे, वैशाली जरग, सीता लाडे, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी– सदस्य, युवा वर्ग, ग्रामस्थ, विद्यार्थी– विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनार्दन बाबर सर यांनी केले. उपस्थितांचे स्वागत, प्रास्ताविक व आभार दशरथ बाबर यांनी व्यक्त केले.

# सांगोला महाविद्यालयात विरंगणा ग्रुपच्या सहयोगाने महिला दिन समारंभ संपन्न



सांगोला : दि.७ मार्च २०२५ रोजी सांगोला महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती व विरंगणा महिला ग्रुप, सैनिकनगर, मैत्रीण कुटुंब सल्ला यांच्या वतीने महिला दिन समारंभ संपन्न झाला. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. सिंधू देशमुख निर्भया, बार्शी शहर पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तर अध्यक्ष म्हणून सांगोला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले हे उपस्थित होते. समारंभाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुणे सौ. सिंधू देशमुख यांनी स्वसंरक्षण या विषयावर संपूर्ण माहिती दिली.

मुलींनी विरंगणा ग्रुप मधील या समारंभात सांगोला परिसरातील यशस्विनींच्या त्यांच्या कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला. त्यामध्ये वीरपत्नी श्रीमती उज्वला शिंदे, सौ.अर्चना गावडे, सौ.शुभांगी माने, सौ.रूपाली गावडे यांचा विशेष सत्कार झाला. पोलीस सौ.प्रतिभा काशीद, सौ. सुरेखा लवटे (पोलीसपाटील बुरलेवाडी) कवयित्री सौ. सुवर्णा तेली, सौ.हर्षदा गुळमिरे, उदयोजिका सौ. सुषमा भिंगे, सौ.सुजाता काकेकर, सौ.अर्चना इंगोले, सौ.रूपाली पवार व कीर्तनकार सौ.सुप्रिया बंडगर आणि कराटेतील यशाबद्दल कु.शुभदा गव्हाणे हिचाही सत्कार करण्यात आला. महिलाप्रमाणे स्वतःबरोबर कुटुंबाची जबाबदारी खंबीरपणे पार पाडत असताना सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवली पाहिजे. तर सशक्त समाजाची निर्मिती होईल यावर आपले विचार मांडले.

तसेच तेरे मेरे सपने या महिला आयोगाच्या वतीने नवीन उपक्रमाची माहिती अॅड.राजश्री केदार यांनी मुलीं समोर मांडली. या उपक्रमाची किती आवश्यकता आहे याचे स्पष्टीकरण दिले. अध्यक्ष मनोगतात प्रभारी प्राचार्य डॉ सुरेश भोसले यांनी महिला दिनाचे विशेष महत्त्व सांगून, महिलांचा सन्मान केला. अनेक यशस्वी महिलांची माहिती देऊन मुलींनी त्यांचा आदर्श घ्यावा यासाठी आपले विचार मांडले.

शेवटच्या सत्रात महिलाच्या स्वरचित कवितांचे सादरीकरण झाले. यावेळी मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्राच्या समुपदेशनाची माहिती सुद्धा महिलांना देण्यात आली. या समारंभास वसतिगृहातील २५० हून अधिक मुली व रुबाब करिअर अकॅडमीतील ५० हून अधिक मुली उपस्थित होत्या. तर सांगोल्यातील सैनिक नगरच्या वीरगंणा ग्रुप व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या समारंभासाठी सांगोला पोलीस स्टेशनच्या सौ.जुलेखा शेख, सौ.छाया तेली, सौ.प्रज्ञा पाटील (मंगळवेढा पोलीस स्टेशन) श्री.गणेश बाबर मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्र, सौ. सुवर्णा गव्हाणे यांची प्रमुख उपस्थित होती.

प्रास्ताविक प्रा.डॉ.चित्रा जांभळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.अपूर्वा गोपलकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. भाग्यश्री पाटील यांनी केले. सत्कार समारंभाचे नियोजनासाठी कु.बोत्रे, कु.भुईटे, कु.सोनटक्के, कु.स्नेहा काकेकर, यांचेही बहुमोल मार्गदर्शन बहुमोल सहकार्य लाभले.

# विद्यार्थ्यांनी ताण तणावापासून मुक्त राहावे-डॉ सुनील लवटे

## डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयात स्ट्रेस मॅनेजमेंट विषयावरील कार्यशाळा संपन्न

सांगोला : आजचे जग हे स्पर्धात्मक आणि ताण तणावाने भरलेले आहे. ताण तणाव निर्माण होण्यासाठी अनेक घटक कारणीभूत असतात. ताण तणाव वाढल्यामुळे अनेक प्रकारचे शारीरिक व मानसिक आजार तयार होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ताणतणावापासून मुक्त राहावे,असे प्रतिपादन डॉ. सुनील लवटे यांनी केले .डॉ गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला या ठिकाणी स्टुडंट्स वेल्फेअर कमिटी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ.सुनील लवटे म्हणाले की, शरीराचा व मनाचा जवळचा संबंध आहे. ताण तणावाची अनेक लक्षणे आहेत जसे की झोप न येणे वजन कमी होणे संभ्रम निर्माण होणे , इ. या ताणतणावामुळे विपरीत परिणाम शरीरावर आणि मनावर होत असतात. त्यामुळे झोप नीट येत नाही. लक्ष केंद्रित होत नाही. संभ्रमावस्था निर्माण होते. अभ्यासावर लक्ष लागत नाही. ताण तणावापासून मुक्त होण्यासाठी ध्यानधारणा चिंतन व योगा करणे आवश्यक आहे. आहार सात्विक असावा. मनावर नियंत्रण असावे. मोबाईलचा वापर कमी करावा. गायीचे तूप वापरावे. विद्यार्थ्यांना मनशांती महत्त्वाचे असते. चिंतन व प्राणायाम करून आपण स्ट्रेस कमी करू शकतो. आहार सात्विक असावा. मन आशावादी असावे .ताण कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ध्यानधारणा प्राणायाम व व्यायाम योगासने करावे. शाकाहारी असणे विद्यार्थ्यांसाठी चांगले आहे. त्यामुळे स्ट्रेस कमी होतो. रात्रीची झोप खूप महत्त्वाची असते. ताण कमी केला तर आपले लक्ष विचलित होत नाही व अभ्यास चांगला होऊन आपले ध्येय गाठणे विद्यार्थ्यांना सुखकर आणि सोयीचे होते. अध्यक्षीय भाषणात संस्थेचे सचिव श्री विठ्ठलराव शिंदे म्हणाले की, आजचे जीवन धकाधकीचे आहे. माणसाच्या जीवनात अनेक अडचणी असतात. आज माणूस वेगवेगळ्या शारीरिक आणि मानसिक व्याधीने त्रस्त झालेला आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला की आजार जडतो. त्यासाठी योग्य आहार आणि विहार व व्यायाम महत्त्वाचा आहे. त्यासाठी पंचकर्म चे उपचार घेतले पाहिजे. प्लास्टिकचा वापर कमी केला पाहिजे. जेवणाकडे सकारात्मक दृष्टीने पहा. शत्रूला सुद्धा चांगला सल्ला देता आला पाहिजे. निरोगी आयुष्य हीच खरी माणसे संपत्ती आहे. हे विद्यार्थ्यांनी आयुष्यभर लक्षात ठेवावे.

प्रास्ताविक कमिटीचे चेअरमन प्रा कैलास सगरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.दीपक शिंदे यांनी केले तर आभार प्रा.सचिन खरात यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कमिटीचे सदस्य प्रा.डॉ.शुध्दोधन कदम व प्रा.अतुल बाबर यांनी परिश्रम घेतले.




# शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांची सांगोला एसटी आगाराला भेट

## महिला सुरक्षेच्या बाबतीत दक्ष राहण्याची गरज : माजी नगराध्यक्षा सौ. राणीताई माने

सांगोला : सांगोला एसटी आगाराला शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी सोमवार दि. ३ मार्च रोजी भेट दिली. स्वारगेट बस स्थानकात नुकत्याच घडलेल्या वाईट घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. सध्या महिला सुरक्षेच्या बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून याचा विचार करून सांगोला नगरपरिषदेच्या माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा राणीताई माने व शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांनी महिला सुरक्षेविषयी माहिती घेण्यासाठी सांगोला एसटी आगाराला भेट दिली.

खेडेगावातून तालुक्यात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची संख्याही खूप मोठी आहे. तसेच सांगोला एसटी आगारांमध्ये महिला प्रवाशांची वर्दळ आहे. एसटी आगारांमध्ये माजी नगराध्यक्षा सौ. राणीताई माने यांच्या टीमने मुलींशी व प्रवाशांसी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेऊन महिला सुरक्षेच्या बाबतीत अधिकाऱ्यांनी दक्ष राहण्याची गरज असून प्रवाशांच्या अडचणी पूर्णपणे दूर करू असे आश्वासन दिले.
माजी नगराध्यक्षा सौ. राणीताई माने यांनी एसटी आगारामध्ये महिलांसाठी बाथरूम व्यवस्था आहे का व ते स्वच्छ आहे का याची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी संवाद साधताना माजी नगराध्यक्षा सौ .राणीताई माने यांना आपल्या अडचणी सांगितल्या. महिम वरून येणाऱ्या विद्यार्थिनींनी सांगितले सकाळची ७.३० वाजताची महीम एसटी बंद आहे ती सुरू व्हावी. आम्हाला शिक्षणासाठी येताना गाड्या उपलब्ध नसतेत त्यामुळे आम्ही कॉलेजला लवकर वेळेत येऊ शकत नाही. संध्याकाळी सांगोला अकलूज गाडी ४ :३० नंतर नाही तरी सांगोला अकलूज गाडी ५: ३० वाजण्याच्या दरम्यान सोडण्यात यावी असे विद्यार्थ्यांनी सांगितले. महिम येथून येणाऱ्या मुलींनी आपल्या तक्रारी माजी नगराध्यक्षा सौ राणीताई माने यांना सांगितल्या.

सांगोला पंढरपूर एसटी मेथवडे स्टॉपला थांबत नाही त्यामुळे खूप अडचण येते . यावेळी सांगोला तालुका शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांनी आगारातील अधिकाऱ्यांची भेट घेऊन महिला प्रवाशांच्या व खेड्यातून शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींच्या अडचणी त्यांना सांगितल्या. तसेच सांगोला एसटी आगारांमध्ये हिरकणी कक्ष नाही याचीही माहिती त्यांनी अधिकाऱ्यांना दिली.

यावेळी शिवसेना महिला पदाधिकारी रुकसाना मुजावर शिवसेना महिला शहर संघटक, मनीषा लिगाडे शिवसेना महिला शहर उपप्रमुख, लतिका मोटे, शिवसेना महिला शहर उपप्रमुख, शांता हाके आदी उपस्थित होते.



# ठिबक व तुषार सिंचनाच्या अनुदानापासून शेतकरी वंचित-आ.बाबासाहेब देशमुख

## ४९०८ लाभार्थ्यांना १६.६५ कोटी अनुदान वितरित-कृषी मंत्री माणिकराव कोकाटे

सांगोला : केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या ठिबक व तुषार सिंचनाचया अनुदानापासून राज्यातील शेतकरी वंचित असल्याबाबतचा प्रश्न आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख,आमदार सुहास बाबर,आमदार गोपिचंद पडळकर,आमदार श्री.नारायण (आबा) पाटील,आमदार समाधान आवताडे यांच्यासह इतर काही आमदारांनी विधानसभेत उपस्थित केला होता. याबाबत उत्तर देताना कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले की, सन २०२४-२५ या वर्षात सांगली जिल्ह्यासाठी रु.१०.१६ कोटी निधी उपलब्ध करण्यात आलेला असून २५८२ एवढ्या लाभार्थ्यांना रु.६.९९ कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

सन २०२४-२५ या वर्षात सोलापूर जिल्ह्यासाठी रु. २०.२८ कोटी निधी उपलब्ध करण्यात आलेला असून ४९०८ एवढ्या लाभार्थ्यांना रु.१६.६५ कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पिक योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेत निधीची तरतूद केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० टक्के प्रमाणात आहे.

केंद्र शासनाकडून योजनेसाठी निधी प्राप्त होताच त्याच्या समरुप राज्य हिश्याची तरतूद करुन आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयास निधी वितरणाकरिता उपलब्ध करुन देण्यात येतो व त्यांचे स्तरावरुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते. सन २०२४-२५ मध्ये प्रति थेंब अधिक पिक या योजनेसाठी केंद्र शासनाकडून ३ हप्त्यात प्राप्त निधी व त्यास अनुसरुन राज्य शासनाचा समरूप हिस्सा असा एकूण रु.५६०.०४ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असल्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

# कैलास बोराडे यास न्याय मिळावा

## सकल धनगर समाज सेवा मंडळाची मागणी

सांगोला : अन्वा, ता.भोकरदर येथील कैलास बोराडे याच्यावर आरोपीकडून अत्याचार करण्यात आला असून प्रत्यक्षअप्रत्यक्ष प्रोत्साहन देणाऱ्या सर्व आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी सांगोला तालुक्यातील सकल धनगर समाज सेवा मंडळाकडून निवेदनाव्दारे तहसीलदार संतोष कणसे यांचेकडे करण्यात आली आहे.

कैलास बोराडे रा.अन्वा, ता. भोकरदर जि.जालना येथील रहिवाशी असुन त्याच्यावर अत्यंत निर्दयीपणे मानुसकीला काळीमा फासणारा क्रुर असा अत्याचार आरोपीकडून करण्यात आला. कैलास बोराडे याला गरम सळईचे चटके देण्यात आले आहेत. संपूर्ण शरीर हे जखमेने माखलेले आहे. सदर घटणेचा व्हिडीओ बघितलेनंतर अक्षरशाः प्रचंड वेदना झाल्याशिवाय राहत नाही. सदर प्रकार हा चिड येणारा आहे. म्हणुन या घटनेमध्ये सहभागी असलेल्या व त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणाऱ्या सर्व आरोपींवर कठोर कारवाई व्हावी. व कैलास बोराडे याला व सखल धनगर समाजाला न्याय मिळावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी सकल धनगर समाज सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे १४९ वंचित लाभार्थ्यांनी आधार कार्ड अपडेट करुन घ्यावे

सांगोला : सांगोला तालुक्यातील ४ हजार ३३१ निराधारांना संजय गांधी निराधार योजनेचा तर २ हजार ८२९ श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थीना प्रती महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे. दरम्यान आधार अपडेशनची प्रक्रिया बाकी असल्याने संजय गांधी निराधार योजनेचे २२८ तर श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेचे १४९ अशा वंचित लाभार्थ्यांनी आधार कार्ड अपडेट करुन घ्यावे, असे आवाहन तहसीलदार संतोष कणसे यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग योजना, कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर एकरकमी २० हजार रुपये अशा वेगवेगळ्या योजनांचा सांगोला तालुक्यातील ८ हजार ७४६ नागरिकांना लाभ मिळत आहे. सांगोला तालुक्यात जवळपास ९५ टक्के लाभार्थ्यांची ई- केवायसी झाली आहे. सांगोल्यात इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेचे १,४७२ लाभार्थी , इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा योजनेचे १०० लाभार्थी , इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग योजनेचे १४ लाभार्थी असून कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर एकरकमी २० हजार रुपये देण्यात येणारी १९ प्रकरणे तहसील कार्यालयाकडे प्राप्त झाली असून त्यांना प्रत्येकी २० हजार रुपये प्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे. शासनाच्या श्रावणबाळ निराधार योजना आणि संजय गांधी निराधार योजना याअंतर्गत अनेक लाभार्थीना आर्थिक मदत मिळते. या निराधारांना डीबीटी प्रक्रियेंतर्गत कागदपत्रे जमा करण्यास सांगितले आहे. परंतु अद्यापपर्यंत अनेकांनी आपली कागदपत्रे तहसील कार्यालयात जमा केली नाहीत. तसेच मोबाइल नंबर आधार व बँक खात्यास जोडलेला नसणे, आधार अपडेट नसणे, या कारणांमुळे लाभार्थीना पैसे मिळण्यास अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे लाभार्थीनी वेळेत सर्व कागदपत्रे तहसील कार्यालयात सादर करावीत.

# सांगोला पिग्मी एजंट लूट प्रकरणाचा लागला छडा; पोलीसांकडून मुख्य आरोपीस अटक



सांगोला : सांगोला शहरात ३ मार्च २०२५ रोजी रात्री सांगोला मिरज रस्त्यावरून माउली वॉशींग सेंटरच्या जवळुन राउत मळ्याकडे जाणारे ओढ्याचे अलीकडील बाजुला असणाऱ्या रस्त्यावर पिग्मी एजंटला ४ अनोळखी इसमांनी अडवुन डोळ्यात मिरची पुड टाकुन, दुखापत करून, त्यांचेकडील २५०००/- रोख रक्कम असलेली बॅग जबरीने चोरून नेली होती. या प्रकरणाचा छडा लावण्यास सांगोला पोलीसांना यश आले असून मुख्य आरोपीस अटक करण्यात पोलीसांना यश आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांनी दिली.

शेखर कारंडे (वय २० वर्षे मुळ रा. मठाचीवाडी फलटण ता.फलटण जि. सातारा सध्या रा सोनंद ता सांगोला जि सोलापुर) यास फलटण शहर पोलीस ठाणे ता फलटण जि सातारा येथुन ताब्यात घेतले असून मा. न्यायालयाने ५ दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. सांगोला पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०३/०३/२०२५ रोजी रात्री ०९:४० ते ०९:५० वा दरम्यान मौजे सांगोला येथील सांगोला शहरातुन सांगोला मिरज रस्त्यावरून माउली वॉशींग सेंटरच्या जवळुन राउत मळ्याकडे जाणारे ओढ्याचे अलीकडील बाजुला असणा-या कच्या रस्तावर आबासो अशोक राऊत (राऊत मळा, सांगोला) हे सांगोला शहरातुन पिग्मीची रक्कम जमा करून त्यांचे राहते घरी जात असताना चार अनोळखी इसमांनी त्यांना अडवुन त्यांचे डोळ्यात मिरची पुड टाकुन, दुखापत करून, त्यांचेकडील २५०००/- रोख रक्कम असलेली बॅग जबरीने चोरून नेल्याने त्यांचे फिर्यादी वरून सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.गुन्हयाचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जगताप हे करीत आहेत. सदरचा गुन्हा हा जाणीवपुर्वक दुखापत करून, जबरी चोरीचा गंभीर स्वरूपाचा असल्याने तात्काळ पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस ठाणे कडुन दोन पोलीस पथके नेमण्यात आली. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकातील सपोनि सचिन जगताप, पोउप. निरीक्षक व्ही. व्ही. माहूरकर, पोहवा वजाळे, पोहेकॉ पलुसकर, पोकॉ पांढरे, पोकॉ आवटे, पोकॉ शिंदे, पोहवा पठाण यांनी गोपणीय बातमीदारमार्फत खात्रीशीर माहीती प्राप्त करून गुन्हयातील मुख्य आरोपीत शेखर कारंडे वय २० वर्षे मुळ रा. मठाचीवाडी फलटण ता.फलटण जि. सातारा सध्या रा.सोनंद ता. सांगोला जि. सोलापुर यास बुद्धी कौशल्याने व चातुर्याने आरोपी यास फलटण शहर पोलीस ठाणे ता.फलटण जि. सातारा येथुन ताब्यात घेतले.

त्यास गुन्हयाबाबत विश्वासात घेवुन विचारपुस केली असता असता आरोपीत याने गुन्हयाची कबुली दिल्याने व आरोपीचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दि.०६/०३/ २०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपीस मा. न्यायालामध्ये हजर केले असता मा. न्यायालयाने अटक आरोपी यास ०५ दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.